MHPU180001102010

**<u>निशाणी क्र.१२६ वरील आदेश</u>**

**(दिनांक १४.०२.२०२३)**

१. प्रस्तुत अर्ज वादी क्र. १ तर्फे प्रतिवादी क्र. १ कोंडाबाई नानासाहेब सोनवणे यांचे वारस रेकॉर्डवर घेणेकामी १२० दिवसांचा विलंब झालेला आहे, तो विलंब माफ करुन वारस रेकॉर्डवर घेण्यासाठी आदेश व्हावा याकरीता दाखल केलेला आहे. त्यांचे असे कथन आहे की, दाव्यातील प्रतिवादी क्र. १ यांनी दावा मिळकतीची विक्री केल्यापासुन ते व त्यांचे वकील दर तारखेस हजर राहात नव्हते व नाही. वादी यांनी दाव्यामध्ये त्यांचे साक्षीपुराव्याचे सत्यप्रतिज्ञापत्र नि. १०८ वर दाखल केलेले आहे. त्याकामी प्रतिवादी क्र. १ ते ११ यांनी वादीचा उलटतपास घेणेकामी मे. कोर्टाने वेळोवेळी तारखा नेमलेल्या होत्या व आहेत. असे असतांना सदर दाव्यातील प्रतिवादी क्र. १५ यांच्या वकीलांनी प्रतिवादी क्र. १ कोंडाबाई नानासाहेब सोनवणे या मयत झाल्या आहेत असे तोंडी कथन केले आहे. त्यानंतर दि. २९/११/२०१८ रोजी मे. कोर्टात नि. ११५ वर त्यांचा मृत्युचा दाखला दाखल केलेला आहे. परंतु प्रतिवादी क्र. १ यांचे वकीलांनी अथवा दाव्यातील इतर प्रतिवादींनी प्रतिवादी क्र. १ यांच्या वारसांची कोणत्याही प्रकारची कायदेशीर माहिती दिलेली नाही व प्रतिवादी क्र. १ यांना किती वारसदार आहेत, त्यांचे नाव पत्त्यासहीत मे. कोर्टात दाखल केलेले नाही. अशी परिस्थिती असतांना वादी यांनी प्रतिवादी क्र. १ कोंडाबाई सोनवणे यांच्या कायदेशीर वारसांविषयी चौकशी करुन माहिती प्राप्त करण्यास बराच कालावधी झालेला आहे. त्यामुळे प्रतिवादी क्र. १ यांचे वारस रेकॉर्डवर घेणेकामी १२० दिवसांचा विलंब झालेला आहे. प्रतिवादी क्र. १ यांचे वारस विजय नानासाहेब सोनवणे हे असुन त्यांना दाव्याचे कामी रेकॉर्डवर घेणेकामी विलंब माफ करुन घेणे न्यायाच्या दृष्टीने अत्यंत आवश्यक आहे. विलंब माफ न झाल्यास वादींचे कधीही न भरुन येणारे अपरिमित नुकसान होणार आहे. याउलट जर सदरचा अर्ज मंजुर झाला तर प्रतिवादींचे काहीएक नुकसान होणार नाही उलट दाव्याच्या कामी मदतच होणार आहे. या सर्व कारणास्तव वादी क्र. १ ने त्यांचा अर्ज मंजुर करण्याची विनंती केली आहे.

२. माझे पुर्वाधिकारी यांनी सदर अर्जावर वारसांना नोटीस काढण्याचे आदेश दि. १६/०७/२०१९ रोजी केले. अर्जात नमुद विजय नानासाहेब सोनवणे यांना नि. १२८ नुसार नोटीसची बजावणी दि. २२/०७/२०१९ रोजी झालेली आहे. परंतु ते आजपावेतो स्वतः अगर वकीलांमार्फत हजर झाले नाही. तसेच सदर अर्जास त्यांनी म्हणणेही दिले नाही. म्हणुन त्यांच्याविरुध्द अर्ज विनाजबाब चालविण्याचा आदेश मी केलेला आहे.

३. प्रतिवादी क्र.१५ यांनी सदर अर्जावर जबाब लिहुन दिला आहे. त्यांचे असे कथन आहे

की, अर्ज दाखल करण्यास विलंब झाला असल्याने रद्द करावा. वादीस जास्तीत जास्त रकमेचा कॉस्टचा आदेश करुन सदरची रक्कम प्रतिवादी क्र. १५ यांना देववावी मगच सदर अर्जाच्या कामी योग्य ते आदेश व्हावेत.

४. प्रतिवादी क्र. १४ यांचेविरुध्द दावा एकतर्फा चालविण्याचा आदेश दि. १६/०७/२०१४ रोजी तसेच प्रतिवादी क्र. ५अ ते ५क विरुध्द दावा एकतर्फा चालविण्याचे आदेश दि. १२/०४/२०१८ रोजी झाले आहे. तसेच प्रतिवादी क्र. २, ३, ४, ६ ते १३ यांचेविरुध्द दावा विनाकैफियत चालविण्यात येण्याचा आदेश दि. १२/०४/२०१८ रोजी झालेला आहे.

५. वादीतर्फे विद्वान वकील श्री. एस.बी.चव्हाण व प्रतिवादी क्र. १५ तर्फे विद्वान वकील श्री. बी.व्ही.देशमुख यांचा सविस्तर युक्तिवाद ऐकला.

६. अभिलेखाची पडताळणी केली असता असे दिसुन येते की, दि. ०३/०४/२०१० रोजी वादी क्र. १ ते ८ यांनी प्रस्तुत दावा जाहीर ठराव व निरंतर मनाईकरीता दाखल केला आहे. दि. ०७/०४/२०१० रोजी दाव्यास क्रमांक पडलेला आहे. त्याचदिवशी प्रतिवादींना समन्स काढण्याचे आदेश झालेला आहे. दाव्यामध्ये प्रतिवादी क्र. १५ यांनी नि. १०३ अन्वये त्यांची कैफियत व जबाब दाखल केलेला आहे. माझे पुर्वाधिकारी यांनी दि. १३/०७/२०१८ रोजी नि. १०७ अन्वये मुद्दे काढलेले आहे. त्यानंतर दावा वादीच्या पुराव्याकरीता नेमण्यात आला. वादी क्र. १ विश्वनाथ राधु उर्फ राघोबा मोरे यांनी त्यांचे पुराव्याचे प्रतिज्ञापत्र दि. ०१/१०/२०१८ रोजी नि. १०८ अन्वये दाखल केलेले आहे. त्यांचा पुढील सरतपास व उलटतपास होण्यापुर्वी वादी क्र. १ हे दि. ०३/११/२०२० रोजी मयत झाले व त्यांचे नावापुढे मयत असे लिहुन त्याचे वारस म्हणुन १अ ते १ड यांना दाव्यात सामील करुन दुरुस्ती केलेली आहे. प्रतिवादी क्र. १ कोंडाबाई सोनवणे दि. २३/०८/२०१८ रोजी मयत झालेली आहे. त्यांचे वारस रेकॉर्डवर न घेतल्यामुळे दावा त्यांचे विरुध्द अबेट झाल्याचा आदेश माझे पुर्वाधिकारी यांनी दि. १२/०६/२०१९ रोजी झालेला आहे. तो आदेश रद्द करण्यासाठी वादीतर्फे दि. १९/०६/२०१९ रोजी अबेटमेंट सेट असाईडचा प्रस्तुत अर्ज दाखल केलेला आहे. प्रतिवादी क्र. १५ यांनी नि. ११५ अन्वये पुरसीस नुसार प्रतिवादी क्र. १ कोंडाबाई नाना सोनवणे दि. २३/०८/२०१८ रोजी मयत झाले असुन त्यांना मुलगा विजय व मुलगी शांताबाई एक मयत मुलीचे वारस असे वारसदार आहेत असे कथन केले आहे. तसेच नि. ११७ यादीलगत कोंडाबाई नाना सोनवणे यांचा मृत्युचा दाखला नि. ११८ वर दाखल केलेला आहे. नि. ११८ वरील मृत्यु प्रमाणपत्राचे अवलोकन केले असता कोंडाबाई नाना सोनवणे हे दि. २३/०८/२०१८ रोजी मयत झाल्याचे दिसते. प्रतिवादी क्र. १५ यांनी दि. २९/११/२०१८ रोजी म्हणजे प्रतिवादी क्र. १ मयत झाल्यानंतर ९७ दिवसांनंतर पुरसीस अन्वये प्रतिवादी क्र. १ मयत असल्याचा दाखला व त्यांच्या वारसांची माहिती

दिल्याचे नि. ११५ व ११८ वरुन दिसुन येते. त्यानंतर वादींना प्रतिवादी क्र. १ च्या वारसांची खात्रीशीर माहिती मुदतीत मिळाली नाही. म्हणुन माझे पुर्वाधिकारी यांनी प्रतिवादी क्र. १ यांचेविरुध्द दावा अबेट करण्याचा आदेश दि. १२/०६/२०१९ रोजी केलेला आहे. त्यानंतर दि. १६/०६/२०१९ रोजी प्रस्तुत अर्ज दाखल केलेला आहे. नि. १६७ वरील आदेशानुसार प्रतिवादी क्र. १ विरुध्द झालेला अबेटमेंटचा आदेश खर्च र.रु. १,०००/– प्रतिवादी क्र. १५ यांना दिल्यानंतर रद्द होईल असा आदेश मी केलेला आहे.

७. प्रतिवादी क्र. १ दि. २३/०८/२०१८ रोजी मयत झालेले आहे. त्यानंतर दि. १६/०७/२०१९ पावेतो वादी यांना प्रतिवादी क्र. १ यांचे वारस रेकॉर्डवर घेण्यासाठी ७ महिने व २४ दिवसांचा विलंब झालेला दिसुन येतो. तो विलंब जाणीवपुर्वक झालेला दिसुन येत नाही. दावा हा निरंतर ताकीद व जाहीर ठराव याकरीता दाखल केलेला आहे. प्रतिवादी क्र. १ चे वारस रेकॉर्डवर घेणेकामी झालेला विलंब माफ करुन त्यांचे वारस रेकॉर्डवर घेणे आवश्यक आहे. उपरोक्त सर्व विवेचन, कारणास्तव प्रस्तुत अर्ज मंजुर होण्यास पात्र ठरतो. करीता मी खालील आदेश करीत आहे.

**आदेश**

१. अर्ज नि.१२६ हा र.रु. १००/– (रुपये शंभर फक्त) खर्च प्रतिवादी क्र. १५ यांना पुढील तारखेपर्यंत द्यावे या अटीवर मंजुर करण्यात येतो.

२. वादी क्र. १ ने खर्चाची रक्कम दिल्यानंतर प्रतिवादी क्र. १ कोंडाबाई नानासाहेब सोनवणे यांचे वारस विजय नानासाहेब सोनवणे यांना रेकॉर्डवर घेणेसाठी झालेला ७ महिने व २४ दिवसांचा विलंब माफ करण्यात येईल.

३. वर नमुद आदेशाची पुर्तता पुढील तारखेपर्यंत न झाल्यास वादी क्र. १ यांचा अर्ज नि.१२६ नामंजुर झाला असे समजण्यात येईल.

४. वर नमुद १ ते ३ बाबींची वादी क्र. १ व त्यांच्या वकिलांनी नोंद घ्यावी.

JYOTI BHARAT GOYAL
Digitally signed by JYOTI BHARAT GOYAL
Date: 2023.02.15 13:04:59 +0530

(श्रीमती. जे.एस.खेडकर–गोयल)
दिवाणी न्यायाधीश क.स्तर, दौंड
ता.दौंड, जि. पुणे

दि.१४.०२.२०२३

CERTIFICATE

"I affirm that the contents of this PDF file Order are same word for word as per original Order"

| | | |
|---|---|---|
| Name of the Steno | :- | P.D.Jagatap |
| Court name | : | Smt. J. S. Khedkar-Goyal,<br>J.M.F.C, (Court no.1), Daund,<br>Tq.Daund, Dist.Pune |
| Order date | : | 14/02/2023 |
| Order signed by | : | |
| Presiding Officer on | : | 14/02/2023 |
| Order uploaded on | : | 15/02/2023 |